22 APR 2018 लोकमत

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर

## कुलगुरु आणि शिक्षण संस्थांच्या संचालकांची ९ जुलै रोजी बैठक

# उच्चशिक्षण संस्थांत कौशल्य विकासासाठी मागविल्या सूचना

एस. के. गुप्ता।
लोकमत न्यूज नेटवर्क

◆ यूजीसीच्या अधिकाऱ्याने सांगितले की, हे मुद्दे लक्षात ठेवून येत्या जुलै महिन्यात होणाऱ्या बैठकीत उच्चशिक्षण संस्थांमध्ये डिजिटल एज्युकेशनबद्दल आतापर्यंत काय झाले याचा आढावा घेतला जाणार आहे. सगळे कुलगुरु व संचालकांच्या बैठकीत उच्चशिक्षणात सुधारणा, व्यावसायिक व कौशल्य शिक्षणावरही चर्चा होईल

नवी दिल्ली : उच्चशिक्षण संस्थांमध्ये शिक्षण घेत असलेल्या विद्यार्थ्यांना पदवीच्या शिक्षणासोबतच कौशल्य विकासाचे शिक्षण कसे द्यावे आणि उच्चशिक्षणाच्या गुणवत्तेत सुधारणांसाठी काय काय करावे लागेल? याचा तरुणांना पदवीसोबतच रोजगारही मिळवण्यासाठी कितपत फायदा होईल, याबाबत सर्व विद्यापीठांचे कुलगुरु आणि उच्चशिक्षण संस्थांचे संचालक यांचे सल्ले, सूचना मागविण्यासाठी एक बैठक बोलविण्यात आली आहे.

यूजीसीचे अध्यक्ष प्रो. धीरेंद्र पाल सिंह यांनी उच्चशिक्षण संस्थांना जारी केलेल्या निर्देशात म्हटले आहे की, ही बैठक ९ जुलै रोजी होणार आहे. विविध संस्थांकडून येणारे सल्ले विचारात घेऊन यावर मंथन करण्यात येणार आहे. मनुष्यबळ विकास मंत्रालयाच्या एका वरिष्ठ अधिकाऱ्याने सांगितले की, देशातील २५ टक्के उच्चशिक्षित तरुणांमधील फक्त ३ टक्के तरुणांकडे कौशल्य आहे. या बैठकीनंतर उच्चशिक्षण धोरणाचा आराखडा तयार करण्यात येणार आहे.

मंत्रालयाच्या एका अधिकाऱ्याने सांगितले की, तंत्रज्ञानातील पदव्या या रोजगाराला पूरक असाव्यात. हीच बाब लक्षात घेता इंजिनीअरिंगचा अभ्यासक्रम रीडिझाईन करण्यात आला आहे. देशातील तरुणांना कौशल्यनिपुण करण्यासाठी कौशल्य विकास मंत्रालय धोरण आखत आहे. २०२२ पर्यंत ५० लाख विद्यार्थ्यांना प्रोफेशनल कॉलेजमधून कौशल्य विकासाचे शिक्षण दिले जाईल आणि उर्वरित ५० लाख विद्यार्थ्यांना नॉन प्रोफेशनल कॉलेजमधून प्रशिक्षण दिले जाईल.

आता जे विद्यार्थी १८ वर्षांचे आहेत त्यांना २३ वर्षांपर्यंत कौशल्य विकास शिक्षण देण्याची तयारी करण्यात येत आहे. कारण, दरवर्षी प्रोफेशनल आणि नॉन प्रोफेशनल कोर्सला १०-१० लाख विद्यार्थी प्रवेश घेत आहेत.

उच्चशिक्षणातील सुधारणांबाबत नुकतीच मध्यवर्ती सल्लागार मंडळाची (शिक्षण) बैठक झाली. त्यातही पाच वर्षांत १.५ कोटी विद्यार्थ्यांसाठी अतिरिक्त शिक्षण मिळण्यासाठी साधने तयार करावे लागतील हे निश्चित करण्यात आले. कारण देशात दरवर्षी १.२८ कोटी युवकांची भर पडत आहे.

या परिस्थितीत भारतात कौशल्य विकास आधारित शिक्षण देणे गरजेचे बनले आहे. यूजीसीच्या अधिकाऱ्याने सांगितले की, हे मुद्दे लक्षात ठेवून येत्या जुलै महिन्यात होणाऱ्या बैठकीत उच्चशिक्षण संस्थांमध्ये डिजिटल एज्युकेशनबद्दल आतापर्यंत काय झाले याचा आढावा घेतला जाणार आहे. सगळे कुलगुरु व संचालकांच्या बैठकीत उच्चशिक्षणात सुधारणा, व्यावसायिक व कौशल्य शिक्षणावरही चर्चा होईल. जुलैच्या शेवटी होणाऱ्या बैठकीत उच्चशिक्षणाच्या संस्थांमध्ये चांगल्या संशोधनाला कसे प्रोत्साहन द्यावे, यावरही मंथन होईल.

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 APR 2018
तरुण भारत

# विद्यापीठात पर्यटन गाईड्स अभ्यासक्रम सुरू करणार

**कोल्हापूर :** पर्यटकांना कोल्हापूर जिल्ह्याची भौगोलिक माहिती देत पर्यटनस्थळे दाखवणासाठी गाईडस् नाहीत. यासंदर्भात शिवाजी विद्यापीठात 'पर्यटन गाईड' हा अभ्यासक्रम सुरू करावा, या मागणीसाठी डी. वाय. पी. हॉस्पिटॅलिटीचे संचालक ऋतुराज पाटील यांनी कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांच्याशी चर्चा केली. चर्चेदरम्यान हा अभ्यासक्रम त्वरित सुरू करण्याचे आश्वासन डॉ. शिंदे यांनी दिले.

कोल्हापुरातील ऐतिहासिक वारसा, प्राचीन मंदिरे, गडकोट, स्मारके, शिल्पे, हस्तलिखिते यांची महती देश विदेशात पोहचवण्यास गाईडअभावी अडथळे निर्माण होतात. भाषेचाही मोठा प्रश्न निर्माण होतो. त्यामुळे शिवाजी विद्यापीठाने 'पर्यटन गाईड' अभ्यासक्रम सुरू करावा. कारण यातून गरजू व होतकरू विद्यार्थ्यांना रोजगाराची संधीही मिळेल, अशी संकल्पना ऋतुराज पाटील यांनी विद्यापीठ प्रशासनासमोर मांडली आहे.

**कुलगुरू डॉ. देवानंद शिंदे यांचे ऋतुराज पाटील यांना आश्वासन**

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 APR 2018
Times of India

# SUK declares timetable of online entrance exams

Piyush.Bhusari
@timesgroup.com

**Kolhapur:** Shivaji University, Kolhapur (SUK) has declared the details of the upcoming entrance examination for over 20 courses. Almost all the examinations will be conducted online this year except the masters exam for faculty change for which a written examination will be conducted.

Institutes where the examination will be held have already been declared in Kolhapur, Sangli and Satara districts. Most colleges, which have been selected to conduct the examination, are engineering colleges considering they have the necessary infrastructure for conducting the online examination.

The written examination will be conducted at the humanities building in the SUK campus.

The online entrance examinations for Yashwantrao Chavan School of Rural Studies will be held on May 29.

According to the university officials, the exam schedule for BSc and MSc nano science will be declared later in a separate notification.

The entrance examination for other major courses like MCA, chemistry, computer science, microbiology, mathematics, botany, electronics, physics, MJC and geology will be conducted between May 22 and May 28.

With over 40 different departmental courses, the university conducts entrance examination for over 25 postgraduate courses every year. Other course like social science, language and political science do not require an entrance exam. There are many such courses which students can opt for a postgraduate or diploma degree, said a varsity official.

## EXAM FEVER

### Important dates

- Apply with regular fees — May 2 (₹200)
- Apply with late fees — May 5 (₹300)
- Apply with super late fees — May 7 (₹800)

### Schedule

- **May 22** | MSc (Geography), MA (Mass Communication), MSc (Alcohol Technology), Bachelor of Journalism, Master of Journalism, MSc (Agro chemical and pest management), MSc (Sugar technology), MSc (Geology), MSc (Electronics), MSc (Microbiology), MSc (Industrial Microbiology), MSc (Zoology), MSc (Biochemistry), BLib & Inf Sc, MLib and Inf Sc
- **May 23** | MA entrance for other faculty (faculty change)-written exam
- **May 24** | MSc (Chemistry), MSc (Mathematics), MSc (Physics)
- **May 26** | MSc (Statistics), MSc (Applied Statistics and informatics), MSc (Botany), MSc (Computer science)
- **May 28** | MSc (Environmental science), MSc (Food science and Technology), MTech (Rural Technology), MBA and distance MBA
- **May 29** | MRS, MBA, MSW (All courses under Yashwantrao Chavan School of Rural Development)

### Results out

- Initial merit list of all entrance exams | **June 11**
- Discrepancies to be reported if any | **June 14**
- Display of final merit list | **June 15**

### Admission rounds

| | |
|---|---|
| **Round 1** | June 19 |
| **Round 2** | June 23 |
| **Round 3** | June 26 |

### Contact

0231-2609489, 0231-2609488, 0231-2609142

जनसंपर्क कक्ष
शिवाजी विद्यापीठ, कोल्हापूर
22 APR 2018
महाराष्ट्र टाईम्स

# विद्यापीठाच्या प्रवेश परीक्षा २२ मे पासून

कोल्हापूरः येत्या शैक्षणिक वर्षासाठी शिवाजी विद्यापीठातर्फे घेण्यात येणाऱ्या प्रवेश परीक्षा २२ मे ते २९ मे कालावधीत होणार आहेत. त्यासाठी अर्ज करण्याची प्रक्रिया शुक्रवारपासून (ता. २०) सुरू झाली. अंतिम मुदत २ मे, विलंब शुल्कासह मुदत ५ मे तर अतिविलंब शुल्कासह ७ मेअखेर अर्ज करण्याची अंतिम मुदत आहे. दरम्यान यंदा सर्व परीक्षा ऑनलाइन पद्धतीने घेण्यात येणार आहेत. एम. ए., एम. एस्सी, एम. ए. मास कम्युनिकेशन, एम. एस्सी. अल्कोहोल टेक्नॉलॉजी, बीजेसी, एमजेसी, एम. एस्सी शुगर टेक्नॉलॉजी, पेस्ट मॅनेजमेंट अँड अॅग्रो केमिकल, इलेक्ट्रॉनिक्स, जिओलॉजी, बी. लिब. एम. लिब यासह सर्व अभ्यासशाखांच्या प्रवेश परीक्षांचे नियोजन करण्यात आले आहे.